**माहे जानेवारी २०२३ महाचा मासिक अहवाल :-**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १. | यवतमाळ | कॅंडी डॉबरमॅन मेल | १) स.पो.फौ./१०६४ मधुकर तोडसाम<br>२)पोहवा/१४६२ सुनिल पजगाडे | पोफाळी पो. स्टे. गु.र.नं. ०३/२०२३ भा.द.वि. कलम ३०२, २०१ प्रमाणे हा गुन्हा दि. ०६/०१/२०२३ रोजी ००.४९ वा. दाखल असून सदर गुन्हयाचे घटनास्थाळी पोलीसांनी जप्त केलेली प्लॅस्टीकचे चप्पल चा वास श्वान कॅंडी हीस देवून सोडले असता ती घटनास्थळी फिरून बापूराव चव्हाण यांचे शेतातील सोयाबीन चे कुटार जळलेल्या ठिकाणा पर्यंत येवून फिरून ज्या ठिकाणी संशयीत आरोपी उभा होता त्या ठिकाणी जावून वास घेवून श्वान कॅंडी थांबली. श्वान कॅंडीस पुन्हा चप्पलचा वास दिला असता तीने संशयीत आरोपी संजय साखरे यांचे जवळ जावून वास घेवून त्यांचे छातीवर समोरील दोन्ही पाय ठेवून भुंकून इशारा दिला. सदर इसमास ताब्यात घेवुन तपासी अंमलदारांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २. | रत्नागिरी | रॅम्बो डॉबरमॅन मेल | १) पोहवा/८३१ व्ही.सी. आंब्रे<br>२) पोहवा/३१७ बी.ए.राणे | संगमेश्वर पो. स्टे. गु.र.नं. १३/२०२३ भा.द.वि. कलम ४५४, ३८० प्रमाणे हा गुन्हा दि. ३१/०१/२०२३ रोजी १८.३१ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळी ज्या कापडी पर्स मधुन पैसे चोरीला गेले होते त्या पर्सचा वास श्वान रॅम्बो यास दिला असता श्वान रॅम्बो वास घेत घटनास्थळावरून निघून फिर्यादींचे घराचे उत्तर दिशेकडील मुख्य प्रवेशव्दाराने बाहेर येवुन अंगणातुन डावीकडून उत्तर दिशेला बाहेर पडून गुरांचे गोठयाजवळील पायवाटेने सुमारे ३५ मीटर अंतरावर असलेल्या श्री. सोमा विश्राम ओकटे यांचे घराचे मुख्य प्रवेशव्दाराने आत प्रवेश करून भुंकू लागला.  सदर इसमास ताब्यात घेवुन तपासी अंमलदारांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३. | रत्नागिरी | विराट डॉबरमॅन मेल | १) पोहवा/८०० एम.ई.हरचिरकर<br>२) पोहवा/४४१ एस.एस.कोतवडेकर | संगमेश्वर पो. स्टे. गु.र.नं. ०२/२०२३ भा.द.वि. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे हा गुन्हा दि. ०८/०१/२०२३ रोजी १८.३८ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर अज्ञात आरोपीचा वापरता टॉवेल पडलेला होता सदर टॉवेलचा वास श्वान विराट यास दिला असता तो वास घेत फिर्यादी यांचे घराचे कंपाउंड मध्ये घुटमळून घराचे पुर्व दिशेचे बाजूस सुमारे २० फुट अंतरावर असणा-या पायवाटेने वास घेत सुमारे १०० ते १५० मीटर अंतर जावुन घटनास्थळाचे दक्षिणेस असलेल्या संशयीत इसम संजय महादेव कळंबटे यांचे राहते घराचे दरवाज्याजवळ जावून वास घेत तेथे घुटमळून भुंकू लागला. सदर इसमास ताब्यात घेवुन तपासी अंमलदारांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |




अशा प्रकारे माहे जानेवारी २०२३ मध्ये श्वान पथकामार्फत खून - १, घरफोडी - २ असे एकुण - ३ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.